सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ५९ | रविवार, दि. २३ नोव्हेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

# कार, बंगला, सगळी सुखे हात जोडून उभी तरीही...

## प्रसिद्ध डायमंड इंडस्ट्रियलिस्टचा १८ वर्षांचा मुलगा बनणार आज जैन मुनी



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्रसिद्ध हिरे व्यापाऱ्याचा मुलगा ऐशोआरामी आयुष्य सोडून जैन मुनी बनणार आहे. सगळी सुखे त्याच्यासमोर हात जोडून उभी असताना त्याने हा निर्णय घेतला आहे.

पाच वर्षांपूर्वीच जशची अध्यात्माकडे ओढ आयुष्य ऐशोआरामात घालविण्यासाठी या १८ वर्षांच्या मुलाकडे सगळे काही आहे. पैसा, प्रतिष्ठा, महागडी घड्याळे, महागडे चष्मे, दागिने सर्व काही आहे. पण त्याने या सर्वांचा त्याग केला आहे. आम्ही बोलत आहोत सुरतमधील (गुजरात) प्रसिद्ध डायमंड इंडस्ट्रियलिस्टचा १८ वर्षांचा मुलगा जश मेहताबद्दल. तो रविवार, २३ नोव्हेंबर २०२५ रोजी जैन मुनी बनणार आहे. यशोविजय सुरेश्वरजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली दीक्षा घेण्यासाठी त्याने हे लक्झरी लाइफ सोडले आहे. जश मेहताने इयत्ता दहावीत ७० टक्के गुण मिळविले. त्याला क्रिकेट खूप आवडते. त्याशिवाय जशला ओरिजनल डायमंड ज्वेलरी, लग्जरी घड्याळे, महागड्या कार, महागडे चष्मे यात इंटरेस्ट आहे. त्याची आई म्हणाली, की जशने जो रस्ता निवडला आहे त्या मार्गावर संपूर्ण कुटुंब त्याला साथ देईल.

जशने दीक्षा घेण्याचा निर्णय घेतला, याचा मला अभिमान आहे. जशला खाणे, फिरणे आवडते. यात घड्याळे, चष्मे आणि दागिने सुद्धा आहेत. पण त्याने हे सर्व सोडण्याचा निर्णय घेतला आहे.

पाच वर्षांपूर्वीच जशची अध्यात्माकडे ओढ वाढलेली आहे. तो काकांनी घेतलेल्या दीक्षेने प्रभावित झालेला आहे. त्याचे काका ऐशोआरामी आयुष्य जगायचे. सुरूवातीला ते धार्मिक नव्हते. एक पुस्तक वाचल्यानंतर ते पूर्णपणे बदलले. या बदलाचा जशवर परिणाम झाला.

### जैन मुनी बनणे किती कठीण?

जैन मुनी बनणे सोपी गोष्ट नाही. ही एक तपस्या आहे. व्यक्तीला सर्व संसारिक सुखे सोडावी लागतात. जैन मुनीला धर्माच्या आधारावर चालताना कठीण नियम आणि शिस्त पाळावी लागते. यात अहिंसा, सत्य, अचौर्य, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह असे सिद्धांत आहेत. जैन मुनी बनण्यासाठी जैन धर्माची शिक्षा आणि शास्त्राचे ज्ञान आवश्यक आहे. एका आचार्याकडे दीक्षा ग्रहण करावी लागते. दीक्षेवेळी आचार्यांच्या मार्गदर्शनाखाल एक व्यक्ती जैन धर्माचे नियम समजून घेतो. त्यांचे पालन करण्याचा संकल्प घेतो. जैन मुनी बनल्यानंतर व्यक्तीला दिवसातून फक्त एकदाच भोजन करता येते. बेड त्यागून जमिनीवर झोपावे लागते. मुनीकडे तीन गोष्टी नेहमी असतात. कमंडलू, शास्त्र आणि पिच्छी.



# तुम्हीही रात्री १ नंतर झोपता का?

## डीप स्लीप कमी झाल्यास वाढतात आरोग्याच्या 'या' तक्रारी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ताज्या संशोधनानुसार उशिरा झोपण्याची सवय नैराश्य, अति तणाव, जैविक ताण, साखरेतील अनियमितता आजारांचा धोका वाढवते. बदलत्या जीवनशैलीत मोबाईल, कामाचा ताण आणि मनोरंजनाच्या साधनांमुळे अनेक जण मध्यरात्रीनंतर झोपतात. मात्र, रात्री १ नंतर झोपण्याची सवय शरीरावर गंभीर दुष्परिणाम करते, असे ताज्या संशोधनातून दिसून आले आहे.

**मानसिक आरोग्यावर थेट परिणाम करणारे निष्कर्ष**

२०२४ मध्ये सायकिअ‍ॅट्रिक रिसर्च या आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या अभ्यासातून रात्री १ नंतर झोपणाऱ्यांमध्ये नैराश्य आणि अतितणावाच्या विकाराचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढलेले आढळते.

**उशिराच्या झोपेमुळे मनस्थिती अस्थिर**

अभ्यासात असेही स्पष्ट झाले की, रात्री लवकर झोपणाऱ्या व्यक्तींची मानसिक स्थिरता जास्त चांगली राहते. उशिरापर्यंत जागणाऱ्यांमध्ये चिडचिड, भावनिक अस्थिरता आणि दिवसभराचा थकवा अधिक दिसतो.

**जैविक घड्याळाचा समतोल बिघडतो**

आपल्या शरीरातील नैसर्गिक जैविक लय, झोपेची वेळ नियंत्रित करते. रात्री उशिरा झोपल्याने ही लय ढासळते. परिणामी सकाळी उठण्यास त्रास होतो. दिवसभर ऊर्जा कमी जाणवते आणि मेंदूची कार्यक्षमता घटते.

**साखरेच्या पातळीतील चढ–उतार**

जामा नेटवर्क ओपनमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनानुसार मध्यरात्र ओलांडल्यानंतर झोपणाऱ्या व्यक्तींमध्ये रक्तातील साखरेतील अनियमितता जास्त प्रमाणात आढळली.

**प्रत्येकाची झोपेची लय वेगवेगळी**

तज्ज्ञांच्या मते, प्रत्येक व्यक्तीचा जैविक झोपेचा प्रकार (क्रोनोटाइप) वेगळा असतो. काही जण उशिरा झोपले तरी सात–आठ तासांची झोप पूर्ण केली, तर ते सामान्य असू शकते. जेव्हा समस्या निर्माण होते तेव्हा झोप अपुरी राहते. उशिरा झोपून सकाळी लवकर उठावे लागल्यास झोपेचा दर्जा खालावतो.

**झोप का महत्त्वाची?**

रात्री १० ते १२ या वेळेत सर्वांत चांगली झोप लागते. याच टप्प्यात शरीरातील दुरुस्ती प्रक्रिया, मेंदूतील विषारी पदार्थांची स्वच्छता आणि वाढीसंबंधी संप्रेरकांची निर्मिती होते.

**चांगल्या झोपेसाठी तज्ज्ञांची शिफारस**

रात्री हलकी प्रकाशयोजना ठेवणे, पुस्तक वाचणे, शांत संगीत ऐकणे, झोपण्याच्या किमान एका तासापूर्वी स्क्रीनपासून दूर राहणे, झोपेची वेळ निश्चित ठेवणे, रात्री कॅफिन टाळणे आणि झोपेसाठी अनुकूल थंड, शांत व अंधारमय वातावरण तयार करणे फायदेशीर ठरते.

# खरीप हातातून गेला, आता शेतकऱ्यांची रब्बीवर आशा!

## अमळनेर तालुक्यात गहू, हरभरा, मका पेरणीला सुरूवात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर- यंदा अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचा खरीप हंगाम वाया गेला आहे. त्यामुळे कर्जाच्या खाईत लोटला गेलेला शेतकरी कमालीचा हताश झाला आहे. मात्र, यातून सावरण्यासाठी शेतकी आता रब्बीच्या तयारीला लागले आहेत. रब्बी हंगाम तरी चांगला येईल, अशी आशा शेतकऱ्यांना लागून आहे. गहू, हरभरा, मका, ज्वारी पेरणीला शेतकऱ्यांनी सुरुवात केली आहे.

यंदा जून ते ऑगस्ट दरम्यान झालेल्या पावसाने खरीप हंगाम चांगला येईल, अशी शेतकऱ्यांना आशा होती. मात्र, सप्टेंबर ते ऑक्टोबर महिन्यात ऐन पिके काढण्याच्या कालावधीत अवकाळी पावसाने कहर केला होता. कापूस, मका, सोयाबीन, ज्वारी, बाजरी, मूग आदी पिकांचे मोठे नुकसान झाले होते. पिके जमिनदोस्त झाली होती. उरली सुरली पिकेही पाण्यात भिजून खराब झाली होती. हाता तोंडाशी आलेला घास निसर्गाच्या लहरीपणाने हिरावला गेला होता. परिणामी शेतकऱ्यांचा लागवडीचा खर्चही निघालेला नाही. शेतकऱ्यांवर कर्जाचा डोंगर उभार राहिला आहे. जेवढा शिल्लक होता त्या मालालाही हमीभाव नसल्याने शेतकरी कमालीचा चिंतीत होता. मात्र, बळीराजा पुन्हा जोमाने कामाला लागला असून, आता रब्बीच्या आशेवर पेरणीच्या कामाला लागले आहेत.

### मजुरांची टंचाई, आधुनिक यंत्रांचा वापर

पावसाळी पिकांनी शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. हंगाम लांबल्यामुळे मका, हरभरा, कापूस तसेच ज्वारी, गहू पेरणी एकाच वेळी सुरू झाली आहे. यामुळे मजूर टंचाई भासत आहे. जादा पैसे देऊन तसेच मजुरांना येण्या– जाण्याचे भाडे देऊनही मजुर मिळेनासे झाले आहेत. वेळेवर पूर्ण कामे व्हावीत म्हणून शेतकरी ट्रॅक्टर, आधुनिक यंत्राच्या सहायाने लागवड करीत आहेत. पारंपरिक पद्धतीने मका किंवा हरभरा लागवडीसाठी एका एकरसाठी सुमारे पाच ते सहा मजूर लागतात. एका मजुराचा दिवसाचा दर ३०० रुपये आहे. सहा मजूर लावल्यास १ हजार ८०० रुपये खर्च येतो. मात्र, यंत्राद्वारे पेरणी केल्यास खर्च कमी येतो. परिणामी शेतकऱ्याची आर्थिक बचत होत आहे. कामेही वेळेवर पूर्ण होत आहेत. यंत्रांच्या साह्याने वेळेवर काम पूर्ण होते. खर्चही कमी होतो, असे मंगरूळ येथील शेतकरी दीपक बोरसे यांनी सांगितले.

### हजारो शिक्षकांचे भवितव्य अधांतरी

# शाळांवर बंदीची कुऱ्हाड कोसळणार?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : राज्यातील हजारो शिक्षकांचे भवितव्य अधांतरीतच आहे. सरकार याकडे दुर्लक्ष करत आहे. राज्यातील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन ५ डिसेंबर २०२५ पर्यंत करण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले आहेत. शिक्षकांच्या प्रलंबित सेवा–शर्ती प्रकरणांवर होत असलेल्या विलंबाबाबत शिक्षण अधिकाऱ्यांची ढिलाई संपवा अशा मागण्या आता शिक्षक संघटनांनी केल्या आहेत. राज्य शासनाने ५ डिसेंबरपर्यंत अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत.

मात्र अद्याप अतिरिक्त शिक्षकांची अचूक संख्या निश्चित न झाल्याने नेमक्या किती शिक्षकांचे समायोजन करायचे, याबाबतच गोंधळ आहे. शिक्षण विभागाने १५ मार्च २०२४ च्या परिपत्रकाचा आधार घेत समायोजन प्रक्रिया २०२४–२५ या शैक्षणिक वर्षासाठी राबवावी असे आदेश दिले आहेत. ५ डिसेंबर २०२५ ही समायोजनाची शेवटची तारीख देण्यात आली आहे. मात्र अचानक काढलेल्या या परिपत्रकामुळे अनेक शिक्षकांना आपल्या मूळ शाळेतून भरतीकडे जावे लागणार आहे.

तर कमी पटसंख्या असणाऱ्या अनेक शाळांवर बंदीची कुऱ्हाड कोसळण्याची भीती संघटनांनी व्यक्त केली आहे. समायोजनाच्या या प्रक्रियेमुळे २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांमधील अनेक शिक्षक अतिरिक्त होतील.

हे शिक्षक इतर शाळांमध्ये वळविले जातील. त्यामुळे ज्या शाळांमध्ये शिक्षकांची गरज आहे ती गरज या अतिरिक्त शिक्षकांमुळे भरली जाईल. भरती प्रक्रिया भाषणातच राहण्याची भीती महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महासंघाचे माजी उपाध्यक्ष महेंद्र गणपुले यांनी व्यक्त केली आहे.



# वडिलांचा संकल्प तिन्ही पुत्रांनी केला पूर्ण

## वाय. एस. पाटील यांच्या स्मरणार्थ तिरडी, खुर्चीचे लोकार्पण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- तालुक्यातील शहापूर येथील रहिवासी तथा निवृत्त माध्यमिक शिक्षक युवराज सखाराम पाटील (वाय. एस. पाटील, वय ७६) यांचे शनिवार, दि. १ नोव्हेंबर रोजी दुपारी हृदयविकाराने निधन झाले होते. त्यांनी गौरेश्वर महादेव मंदिराचे फलक तयार करणे, अंत्ययात्रेसाठी तिरडी व खूर्ची भेट देण्याचा संकल्प केला होता. मात्र, त्यांच्या मृत्युमुळे हा संकल्प अपूर्ण राहिला. हा संकल्प त्यांच्या तिन्ही पुत्रांनी पूर्ण केला आहे. त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे समाजातून कौतुक होत आहे.

(स्व.) वाय. एस. पाटील हे ग्रामविकास शिक्षण संस्था (मुडी) संचलित कोळपिंप्री (ता. पारोळा), शिरुड, सारबेटे (ता. अमळनेर) येथील माध्यमिक विद्यालयात अध्यापनाचे कार्य केले होते. ते विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून सर्वपरिचित होते. त्यांचे अनेक विद्यार्थी मोठमोठ्या पदावर कार्यरत आहे. त्यांना तीन मुले, एक मुलगी आहे. मोठे पूत्र चंद्रकांत पाटील गांधली – पिळोदे येथील बालाजी विद्यालयात सहाय्यक शिक्षक आहेत. त्यांचे द्वितीय पूत्र महेंद्र पाटील हे सेल्वास येथील खासगी कंपनीत नोकरीला आहेत. सर्वात लहान पूत्र देवेंद्र पाटील हे माजी सैनिक असून सध्या जव्हार आदिवासी प्रकल्पाचे लिपिक म्हणून कार्यरत आहेत. मुलगी संगीताबाई या विवाहित असून सध्या सुरत येथे वास्तव्यास आहे. आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धातही त्यांनी समाजसेवेचा ध्यास घेतला होता. २००८ मध्ये सेवा निवृत्तीनंतर ते त्यांच्या पत्नी कलाबाई यांच्या समवेत आपल्या मूळ गावी शहापूर येथे वास्तव्यास होते.

समाजाचे आपण काही देणे लागतो या उदात्त हेतूने केलेला त्यांचा संकल्प अपूर्ण राहिला. त्यांच्या दशक्रियेच्या दिवशी तीन्ही पूत्रांनी त्यांचा हा संकल्प पूर्ण केला. समाजासाठी अंत्यसंस्कारास लागणारी तिरडी, खूर्ची आणि मंदिराच्या फलकाचे लोकार्पण केले आहे.

### मशिनमध्ये मका काढताना रूमाल अडकल्याने

# तरुणाचा मृत्यू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : तालुक्यातील पातोंडा येथे मशिनमध्ये मका काढताना रूमाल अडकल्याने तरुणाचा मृत्यू झाला आहे. नितीन सुरेश बिरारी (वय ३६) असे तरुणाचे नाव आहे. ही घटना शुक्रवार, दि. २१ नोव्हेंबर रोजी दुपारी घडली. नितीन बिरारी शेतात मशिनवर मका काढण्याचे काम करीत होता. यावेळी गळ्यातील रूमाल मशिनच्या पंख्यांमध्ये अडकला. पंख्यांच्या अतिवेगाने रूमालचा त्याच्या गळ्याला फास लागला. यात तो गंभीर जखमी झाला होता. परिसरातील शेतकऱ्यांनी त्यास अमळनेर येथील खासगी रुग्णालयात हलविले. मात्र, त्याची प्रकृती अधिक खालावल्याने उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. नितीन बिरारी याच्या भावाचाही आठ महिन्यांपूर्वी मृत्यू झाला आहे. नितीन बिरारी याच्या मागे आई– वडिल, पत्नी दोन मुले असा परिवार आहे.

# जगातील टॉप १०० शहरांची यादी जाहीर

## भारतातील बेंगळुरू, मुंबई व दिल्ली या शहरांचा समावेश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जगातील टॉप १०० शहरांची यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीमध्ये यावेळी लंडन शहराने पहिले स्थान पटकावले आहे. रेझोनन्स कन्सल्टन्सी आणि इप्सॉस या संस्थांच्या वतीने ही यादी जाहीर करण्यात आली आहे. शहरामध्ये राहणाऱ्या नागरिकांचे राहणीमान, तेथील पायाभूत सुविधा आणि रोजगाराच्या संधी या आधारावर ही यादी तयार करण्यात आली आहे. विशेष म्हणजे सलग ११ व्या वेळी या यादीमध्ये लंडन शहराने पहिले स्थान पटकावले आहे. लंडन हे शहर जगभरातील लोकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरल्याचे या संस्थेने म्हटले आहे. रहाणीमान, रोजगाराच्या संधी आणि पायाभूत सुविधांचा विकास या आधारावर लंडन शहराने जगभरात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर दुसऱ्या स्थानी न्यूयॉर्क शहर आहे.




**जगातील पहिली टॉप टेन शहरे**

रेझोनन्स कन्सल्टन्सी आणि इप्सॉस या संस्थांच्या वतीने ही यादी जाहीर करण्यात आली आहे. शहरांमधील पायाभूत सुविधांचा विकास, रोजगाराच्या संधी आणि इतर काही मापदंड वापरून या शहराची निवड करण्यात आली आहे. ज्यामध्ये प्रथम क्रमांकावर लंडन शहर आहे, दुसऱ्या क्रमांकावर न्यूयॉर्क, तिसरा क्रमांक पॅरिस, चौथ्या क्रमांकावर टोकिओ, पाचव्या क्रमांकावर माद्रिद, सहाव्या क्रमांकावर सिंगापूर, सातव्या क्रमांकावर रोम, आठव्या क्रमांकावर दुबई, नवव्या क्रमांकावर बर्लिन आणि दहाव्या क्रमांकावर बार्सिलोना ही शहरे आहेत. दरम्यान, यावेळी आशिया खंडातील तीन शहरांनी टॉप टेन यादीमध्ये स्थान मिळविले आहे. ज्यामध्ये टोकिओ चौथ्या क्रमांकावर आहे. तर सिंगापूर सहाव्या आणि दुबई आठव्या क्रमांकावर आहे. या यादीमध्ये युरोपीयन शहरांचा दबदबा राहिल्याचे पाहावयास मिळत आहे. युरोपमधील अनेक शहरांनी जगातील टॉप शंभर शहरांच्या यादीमध्ये स्थान मिळविले आहे.

### भारतातील किती शहरांचा समावेश?

**या यादीमध्ये भारतातील टॉप तीन शहरांनी देखील स्थान मिळविले आहे. यामध्ये बेंगळुरूने बाजी मारली आहे. या यादीत बेंगळुरू शहर २९ व्या क्रमांकावर आहे, तर मुंबई ४० व्या आणि दिल्ली ५४ व्या स्थानावर आहे.**



# मुलांच्या शिक्षणाचे आर्थिक नियोजन कसे करायचे?

## गुंतवणुकीची सुरूवात कधी करायची?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महागाई वाढत आहे. त्यासोबत शिक्षणाचा खर्चही वाढत आहे. महागाईचा वाढीचा दर पाहता आता शाळेत असलेले मूल जेव्हा कॉलेजला जाईल, पोस्ट ग्रॅज्युएशनच्या वयाचे होईल तेव्हा फी किती असेल याचे गणित करून पाहा. त्यामुळेच भविष्यातील या खर्चासाठी आजच फायनान्शियल प्लॅनिंग करणे योग्य आहे. कारण मूल मोठे झाल्यावर नेमके काय शिकणार आहे? कुठे शिकणार आहे? देशात की देशाबाहेर? किती वर्षे शिकणार आहे? यातले काहीच आपल्याला माहिती नाही. त्यामुळेच मुलांच्या शिक्षणासाठीची आर्थिक गुंतवणूक कशी करायची? ते करताना कोणकोणत्या गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात?

### कोणत्या गोष्टी विचारात घ्याल?

भारतामध्ये शिक्षण क्षेत्रातील महागाई दरवर्षी सरासरी ४-६ टक्के वाढत असल्याचा तज्ज्ञांचा अंदाज आहे. त्यातही सरकारी संस्था आणि खासगी संस्थांमधील शिक्षण यांच्या फीमध्ये प्रचंड तफावत आहे. त्यामुळे भविष्यातील शिक्षण खर्चाचा विचार करताना काही गोष्टी लक्षात घ्यायला हव्यात. म्हणजे साधारण कोणत्या कोर्सचा खर्च किती आहे, महागाईचा दर विचारात घेता त्याचा खर्च किती वाढेल हे बेसिक गणित तर आलेच. पण शिक्षणाचा खर्च म्हणजे फक्त कोर्स फी नाही. त्यात तेथे राहणे, खाणे, गरज असेल तर क्लासेस, वर्षातून ठराविक काही वेळा होणारे प्रवास, व्हिसा प्रोसेसिंग यासगळ्या गोष्टीही येतील. परदेशी शिक्षणासाठीचा विचार करताना हेही लक्षात घ्यायला हवे. की येथे एक्स्चेंज रेट म्हणजे डॉलर किंवा इतर चलनाच्या तुलनेतली रुपयाची किंमत किती आहे, यानुसारही खर्च बदलेल.

उदा. - २००८ मध्ये अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य ४५ रुपये होते. २०२५ मध्ये डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य ८८ रुपये आहे. मुलांचा कल खेळ, संगीत, मनोरंजन क्षेत्राकडे असेल, तर त्यातील कोर्सेससाठीचा वा ट्रेनिंगचा आताचा खर्च किती आहे यावरून अंदाज बांधावा लागेल.

### गुंतवणुकीची सुरूवात कधीपासून?

सगळ्यात आधी जितक्या लवकर सुरूवात कराल तितके चांगले. मूल लहान असतानाच जर १० - १२ - १५ वर्षांनंतरच्या खर्चासाठी गुंतवणूक सुरू केली, तर चक्रवाढीचा फायदा मिळेल. म्हणून एक उद्दिष्ट रक्कम डोळ्यांसमोर ठेवून त्यानुसार गुंतवणूक करा. वेगवेगळ्या प्रकारच्या गुंतवणूक योजनांचा कालावधी वेगवेगळा असतो. त्यामुळे मूल आता किती वर्षांचे आहे यावरून ते कॉलेजला कधी जाईल, उच्च शिक्षणासाठी कधी येईल याचे गणित करून त्या कालावधीत मॅच्युअर होणाऱ्या योजना निवडता येतील. लहान मुलांसाठीच्या काही योजनांवर कर सवलतही मिळते. ही गोष्टही लक्षात घ्यायला हवी. भविष्यासाठीची ही गुंतवणूक आताच्या दरमहा गुंतवणुकीचा भाग करता आली, तर चांगले. म्हणजे इतर खर्च सांभाळून दरमहा काही भाग यासाठी वेगळा काढा.

डायव्हरसिफिकेशन म्हणजे वेगवेगळ्या प्रकारचे गुंतवणूक पर्याय निवडणे महत्त्वाचे असेल. म्हणजे कमी जोखिमीच्या गुंतवणुकीतून खात्रीशीर रिटर्न्स मिळतील आणि काही प्रमाणात जोखीम घेऊन जास्त परतावा मिळण्याची शक्यता असेल. वेगवेगळ्या बँका, वित्तीय संस्था आणि इन्शुरन्स कंपन्यांनी चाईल्ड एज्युकेशन प्लॅन आणले आहेत. हे इन्शुरन्स कम इन्व्हेस्टमेंट प्लॅन आहेत. यातील काही योजनांमध्ये पालकांचा मृत्यू झाल्यास त्यानंतरही पॉलिसी टर्म असेपर्यंत योजना सुरू राहील, अशी तरतूद असते.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आपण केलेल्या गुंतवणुकीचा वेळोवेळी आढावा घ्या. कोणती गुंतवणूक चांगला परतावा देते, कोणती देत नाही यानुसार धोरणे बदला. या सगळ्याच्या जोडीला एज्युकेशन लोन म्हणजे शैक्षणिक कर्जाचा पर्याय आहेच. बहुतेक बँका या ग्रॅज्युएशननंतर वा शिक्षण पूर्ण झाल्यानंतर कर्जाची परतफेड करण्याचा पर्याय देतात. म्हणजे मुले कमवायला लागल्यावर हे कर्ज फेडू शकतात. या सगळ्याचा विचार करून टेन्शन येणे स्वाभाविक आहे. मात्र खर्चाचा विचार करून घाबरून जाण्याची गरज नाही. कारण अनेक युनिव्हर्सिटीजमध्ये स्कॉलरशिप्स, फी कन्सेशन, काही विशिष्ट प्रोग्रॅमसाठी स्पॉन्सर्स अशा गोष्टीही असतात. शिवाय पार्ट टाईम नोकरी करणे, टीचिंग असिस्टन्सशिप अशा गोष्टीही मुलांना करता येतात. त्यामुळे वेळ येईल तेव्हा याचाही शोध घ्यायला हवा.




# स्मृतीच्या विवाहाला काही तास उरले असताना पोलीस आणि डॉग स्क्वॉड पथक दाखल!

## नेमके प्रकरण आहे तरी काय?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सांगलीची कन्या आणि भारतीय महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार स्मृती मानधना यांचा शाही विवाह सोहळा रविवार, दि. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी पार पडणार आहे. त्यासाठी सांगलीतील कवठेपिरांन रोडवरील मानधना फार्म हाऊस सजविण्यात आले आहे. तेथे तिच्या लग्नापूर्वीच्या विधींना सुरूवात देखील झाली आहे. मात्र, स्मृतीच्या विवाह सोहळ्याच्या ठिकाणी अचानक डॉग स्कॉड दाखल झाले आहे. त्यामुळे आता नेमके काय झाले? असा प्रश्न अनेकांना पडला आहे.

स्मृती मानधनाच्या शाही विवाह सोहळ्यासाठी विविध क्षेत्रांतील अनेक मान्यवर येणार आहेत. त्यामुळे सांगली पोलीस दलातर्फे मानधना फार्म हाऊसवर बॉम्ब शोधक डॉग स्कॉड पथक दाखल झाले आहे. त्यांच्याकडून संपूर्ण तपासणी आणि पाहणी करण्यात येत आहे. परंतु अचानक पोलीस आणि डॉग स्कॉड आल्यामुळे अनेक जण सुरूवातीला घाबरले. नंतर केवळ तपासाचा भाग असल्यामुळे पुन्हा सर्व जण आनंदाने मौजमस्ती करू लागले.

### लग्नापूर्वीही शादी प्रीमियर लीग

भारतीय महिला संघाची उपकर्णधार स्मृती मानधना यांच्या विवाह सोहळ्याच्या ठिकाणी रात्री शादी प्रीमियर लीग पार पडली. या निमित्ताने रात्री मानधना फार्म हाऊस जेथे शाही विवाह सोहळा होणार आहे तेथे स्मृती, पलाशसह महिला खेळाडू, इतर पाहुण्यांनी क्रिकेट सामना खेळण्याचा आनंद घेतला. रात्री उशिरापर्यंत दोन्ही कुटुंबीय, महिला खेळाडू आणि दोन्ही कडील मंडळींनी क्रिकेट खेळण्याचा, पाहण्याचा आनंद लुटला. उद्याच्या या शाही विवाह सोहळ्यासाठी मानधना कुटुंबाकडून जय्यत तयारी करण्यात आलेली आहे.

विवाह सोहळ्यासाठी नवरदेव असणारे पलाश मुछल हे वऱ्हाडी मंडळीसह सांगलीत दाखल झाले. मानधना परिवाराकडून त्यांचे जंगी स्वागत देखील करण्यात आले आहे. धुमधडाक्यात होणाऱ्या या विवाह सोहळ्यासाठी क्रिकेट क्षेत्रासह विविध क्षेत्रांतील दिग्गज उपस्थिती लावणार आहेत. आज हळदीचा कार्यक्रम मोठ्या थाटात पार पडला.

# 'या' देशात येताच करोडपती होतात भारतीय

## सुंदरच नव्हे तर स्वस्तही आहे हा देश!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

लाओस या देशाचे अधिकृत नाव लाओ पीपल्स डेमोक्रेटिक रिपब्लिक असे आहे. दक्षिण-पूर्व आशियातील हा एक छोटा परंतु ऐतिहासिक देश आहे. वियनतियाने ही या देशाची राजधानी आहे. भारत आणि लाओसचे संबंध अतिप्राचीन आहेत. सम्राट अशोकाच्या कलिंग युद्धानंतर अनेक भारतीयांनी आसाम आणि मणिपूरच्या मार्गाने इंडोचायना क्षेत्रात आश्रय घेतला. ते तेथेच स्थायिक झाले. कंबोडिया, मलेशिया, व्हिएतनामपर्यंत भारतीय पोहोचले.

### भारतीय कसे होतात येथे करोडपती?

लाओसमध्ये एक भारतीय रुपयाची किंमत जवळपास २५१.९१ लाओ किप इतकी आहे. म्हणजे या देशात जर तुम्ही पन्नास हजार रुपये घेऊन गेले, तर या देशात तुमची रक्कम १.२६ कोटी लाओ किप इतकी होते. वाचताना ही रक्कम मोठी वाटते. पण येथे फिरण्यासाठी मोठा खर्च लागत नाही. हा देश तसा स्वस्त मानण्यात येतो.

### भारतीयांसाठी लाओसवासीयांचा हळवा कोपरा

लाओसमधील अनेक स्थानिक स्वतःची ओळख भारतीयांचे वंशज अशीच करून देतात. या दक्षिण-पूर्वमधील एकमेव देशाला स्वतःचा समुद्र किनारा नाही. या देशाला सर्व बाजूंनी जमीन आहे. पण या देशावर निसर्ग मेहरबान झाला आहे. त्याने या देशावर मुक्त हस्ते उधळण केली आहे. येथे शांतता आणि निसर्गाच्या सान्निध्यात आल्यावर मन प्रसन्न होते. पर्यटक त्यांचा थकवा विसरून जातात. येथील स्ट्रीट फूड अत्यंत रुचकर आणि तितकेच स्वस्त आहे. रूचकर स्टिकी राईस, लार्ब आणि नूडल सूप सारख्या डिशेज केवळ २० ते ४० रुपयात मिळतात. तर स्थानिक प्रवासासाठीची ऑटो १२ ते ४० प्रतिप्रवाशी या दराने मिळते.

### एका दिवसाचा खर्च किती?

या देशातील राहणे, जेवण, पर्यटन आणि मुक्कामाचा सरासरी खर्च साधारणतः १,५०० ते ३,००० रुपये प्रतिदिवस इतका आहे. म्हणजे भारतातील कोणत्याही शहरातील खर्चा इतका आहे. ७ दिवसांची येथील ट्रीप ही साधारपणे चाळीस हजार ते सत्तर हजार रुपयांमध्ये पूर्ण होते. यात हॉटेलिंग, पर्यटनस्थळे पाहणे, जेवण्याच्या खर्चाचा समावेश आहे.

### या देशात जाणे सोपे आहे का?

भारतीय प्रवाशांसाठी लाओस या देशात जाणे सोपे आहे. येथे व्हिसा ऑन ॲरिव्हलची सुविधा मिळते. म्हणजे या देशात अगोदर व्हिसा घेण्याची गरज नाही. मुद्रा विनिमय पण सोपे आहे. येथील लोक आदरतिथ्य करण्यात पुढे आहेत. कमी बजेटमध्ये परदेशात जायचे असेल तर हा देश चांगला पर्याय आहे. येथे जाण्यासाठी मोठ्या शहरातून विमान सेवा आहे.

**सक्सेस स्टोरी**

# यूपीएससी में समीक्षा झा ने फिर गाड़ा झंडा,

## ३६२ वीं रैंक के बाद मेंस में पाया पहला नंबर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

'किस्मत मिलती नहीं, खुद लिखनी होती है' समीक्षा सत्येंद्र झा ने इस लाइन को यथार्थ साबित किया। उन्होंने यूपीएससी द्वारा आयोजित होने वाली सिविल सेवा परीक्षा २०२३ में सफलता हासिल की थी। उस दौरान उन्हें ३६२ रैंक मिली थी, लेकिन इस रैंक से उनका आयएएस बनने का सपना पूरा नहीं हो रहा था, इसलिए उन्होंने इस रैंक को अपनी किस्मत नहीं माना बल्कि अपनी मेहनत पर भरोसा किया। ११ नवंबर को जारी यूपीएससी सीएसई मेंस रिजल्ट २०२५ में उनका नाम मेरिट लिस्ट में टॉप पर है। पढ़ें झा समीक्षा सत्येंद्र ने कैसे की तैयारी, क्या थी उनकी स्ट्रेटजी यूपीएससी में समीक्षा झा ने फिर गाड़ा झंडा, ३६२ वीं रैंक के बाद मेंस में पाया पहला नंबर

सपने को पूरा करने के लिए खुद को जिद्द दिखाना पड़ता है। इस जिद्द में सब कुछ जायज है: ८ से १० घंटे पढ़ना, कड़ा टाइमटेबल फॉलो करना, सिलेबस को समझना, रिवाइज करना, मॉक टेस्ट देना, लिखने की स्किल्स पर काम करना, मनोरंजन का त्याग करना, सोशल न होना इत्यादि। ये निर्भर करता है कि आप कितना फोकस से किसी परीक्षा की तैयारी कर रहे हैं। यही कारण है कोई पहली कोशिश में आयएएस बन जाता है, तो कई बार एक से ज्यादा अटेम्प देने पड़ते हैं। झा समीक्षा सत्येंद्र ने भी एक से ज्यादा अटेम्प्ट दिए लेकिन अपनी रैंक बढ़ाने के लिए।

### यूपीएससी सक्सेस स्टोरी

ये सक्सेस स्टोरी पहले ही अटेम्प्ट में यूपीएससी क्लियर करना, लगातार मेहनत करके कई अटेम्प्ट में मंजिल पाना, फाइनेंशियल मुश्किलों का सामना करना, घर परिवार की जिम्मेदारियों के बीच लक्ष्य को प्राथमिकता देने से भी ऊपर है। यूपीएससी सक्सेस स्टोरी में अक्सर उनके बारे में पढ़ा होगा, जो इस परीक्षा को पास करते हैं, लेकिन अपनी रैंक को बेस्ट करने की कहानी कम ही सुनी होगी।
ये सक्सेस स्टोरी समीक्षा सत्येंद्र झा की है, जिन्होंने २०२३ में यूपीएससी सीएसई में ३६२ रैंक हासिल की, हालांकि आयएएस बनने का सपना पूरा नहीं हुआ। लेकिन लक्ष्य को पाने की जिद्द ने उन्हें उनकी मंजिल तक बहुत हद तक पहुंचाया। बहुत हद तक इसलिए क्योंकि अभी यूपीएससी सीएसई का फाइनल रिजल्ट नहीं आया है।

### यूपीएससी सीएसई का फाइनल रिजल्ट

यूपीएससी सीएसई का फाइनल रिजल्ट आने से पहले इंटरव्यू शेड्यूल होगा, जिसके लिए एडमिट कार्ड जारी किया जाएगा। इस भर्ती अभियान के जरिए ९७९ पदों को भरा जाना है। चूंकि २७३६ अभ्यर्थी यूपीएससी मेंस परीक्षा में पास हुए हैं, ऐसे में १७४७ अभ्यर्थियों को निराशा हाथ लग सकती है।

### समीक्षा सत्येंद्र झा का सपना

वे आईएएस अधिकारी बनना चाहती हैं, और इस बार आईएएस के १८० पद निर्धारित हैं। जबकि आईएफएस के ५५, आईपीएस के १५०, आईए एंड एएस के २८ और आईसीएएस के १५ पदों पर भर्ती होगी।

### कहां से हैं समीक्षा

वे अहमदाबाद, गुजरात की पली बढ़ी हैं। समीक्षा सत्येंद्र झा ने जो इस बार परीक्षा दी है, उसका रोल नंबर ०१००२८७ है। हालांकि इस बार का आप्शनल सब्जेक्ट अभी तक का क्लियर नहीं है, लेकिन २०२३ में इन्होंने पब्लिक एडमिनिस्ट्रेशन लिया था।

### कहां से किया ग्रेजुएशन

समीक्षा सत्येंद्र झा ने केमिकल इंजीनियरिंग में ग्रेजुएशन किया है। वे पढ़ाई में हमेशा सीरियस रही हैं, वे एकेडमिक लेवल पर भी पढ़ाई में अच्छे नंबर लाती थीं, 12वीं पूरा करने के बाद उन्होंने विश्वकर्मा गवर्मेंट इंजीनियरिंग कॉलेज से केमिकल इंजीनियरिंग की और फिर यूपीएससी की तरफ रुझान होने से उन्होंने पूरे मन से इस परीक्षा की तैयारी की। उन्होंने पढ़ाई में सबसे ज्यादा अभ्यास मौक टेस्ट सीरीज का किया। उन्होंने एक वीडियो में कहा है कि 'शुरू में ५-६ टेस्ट सीरीज में उन्हें निराशा हाथ लगी, लेकिन उन्हें ये भी पता चला कि वे कहां स्टैंड करती हैं' इसी बात ने उन्हें खुद की स्ट्रेटजी को सुधारने पर काम किया।



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

## लग्नात नाचताना तरुणाचा मृत्यू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : तालुक्यातल नालखेडा येथे लग्नात नाचताना अतुल ज्ञानेश्वर कोळी (वय २५) याचा मृत्यू झाला आहे. ही घटना शुक्रवार, दि. २१ रोजी दुपारी घडली. तो मूळ धरणगाव तालुक्यातील जांभोरा येथील रहिवासी आहे. सध्या तो नालखेडा येथे वास्तव्यास होता. लग्नात नाचत असताना तो अचानक खाली कोसळला. त्यास खासगी दवाखान्यात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषीत केले. घरातील एकुलता एक मुलगा असल्याने आई- वडिलांसह कुटुबीयांनी एकच हंबरडा फोडला. त्याच्या मृत्यूने नालखेडा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# केशरचे पाणी पिण्याचे अनेक फायदे वाचून व्हाल थक्क

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

केशर हा औषधी गुणधर्मांनी समृद्ध असलेला एक अत्यंत मौल्यवान मसाला आहे, जो प्राचीन काळापासून त्याच्या आरोग्यदायी फायद्यांसाठी ओळखला जातो. जगभरातील अनेक देशांमध्ये त्याची लागवड केली जाते. तर भारतात जम्मू आणि काश्मीरमध्ये केशरची लागवड केली जाते. आयुर्वेदात केशरला औषधी वनस्पती मानले जाते. आपल्याकडे दूध, खीर, बासुंदी अशा विविध गोड पदार्थांमध्ये केशर आवर्जून वापले जाते. पण आम्ही तुम्हाला याच केशरचे पाणी पिण्याचे जबरदस्त फायदे सांगणार आहोत.केशरचे पाणी पिण्याचे जबरदस्त फायदे आहेत. ते खालीलप्रमाणे...

**रोगप्रतिकार शक्ती वाढते**

केशरमधील अँटीऑक्सिडंट्स शरीराची रोगप्रतिकार शक्ती वाढवतात. दररोज सकाळी केशरचे पाणी प्यायल्याने सर्दी आणि इतर संसर्ग टाळण्यास मदत होते.

**त्वचा उजळते.**

जर तुम्हाला चमकदार त्वचा हवी असेल, तर तुम्ही दररोज सकाळी केशरयुक्त पाणी प्यावे. त्यातील अँटीऑक्सिडंट्स आणि दाहकविरोधी गुणधर्म निरोगी त्वचा राखण्यास आणि डाग कमी करण्यास मदत करतात. ते त्वचेला हायड्रेटदेखील करते.

**पचनसंस्था सुधारते**

केशर नैसर्गिकरीत्या पचन सुधारते. सकाळी केशरचे पाणी प्यायल्याने बद्धकोष्ठता, वायू सरणे (गॅस) व अपचन यांसारख्या समस्या कमी होण्यास मदत होते. त्यामुळे छातीत जळजळ आणि आम्लपित्त कमी होण्यासही मदत होते.

**हृदय निरोगी ठेवा**

केशरमधील पोषक तत्त्वे रक्तदाब नियंत्रित करण्यास आणि निरोगी हृदय राखण्यास मदत करतात. ते कोलेस्ट्रॉल कमी करण्यास आणि रक्ताभिसरण सुधारण्यास मदत करते, ज्यामुळे हृदयरोगाचा धोका कमी होतो.

## आजपासूनच पिण्यास करा सुरूवात



**मूड सुधारतो**

आजकाल मूड स्विंग्स होणे ही एक सामान्य समस्या झाली आहे. हार्मोनल असंतुलनामुळे असे होते. केशरचे पाणी मूड स्विंग्सचे प्रमाण कमी करणे, सकारात्मक मूड राखणे व ताजेतवाने ठेवणे यांसाठी तुम्हाला मदत करू शकते.

**वजन घटवण्यासाठी फायदेशीर**

जर तुम्ही वजन कमी करण्याचा प्रयत्न करीत असाल, तर केशरयुक्त पाणी साह्यभूत ठरू शकते. ते चयापचय गतिमान करून, तुम्हाला आहाराचे जास्त सेवन करण्यापासून रोखते.

**झोपेच्या समस्या दूर करते**

जर तुम्हाला रात्री झोप येत नसेल, तर तुम्ही नक्कीच केशरचे पाणी प्यायला हवे. केशरमध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात, जे निद्रानाश कमी करण्यास मदत करू शकतात.

**संतुलित हार्मोन्स**

केशर महिलांमध्ये हार्मोनल संतुलन राखण्यास मदत करते. ते मासिक पाळीतील वेदना कमी करण्यास आणि हार्मोनल असंतुलनामुळे होणाऱ्या समस्यांवर नियंत्रण ठेवण्यास मदत करू शकते.

**हाडांसाठीही फायदेशीर**

केशरमध्ये कॅल्शियम आणि इतर आवश्यक पोषक तत्त्वे भरपूर प्रमाणात असतात. ते हाडे मजबूत करण्यास मदत करते. केशरचे पाणी नियमितपणे प्यायल्याने सांधेदुखी आणि हाडांचा कमकुवतपणा टाळता येतो.

## ज्येष्ठ दांपत्याला वाहकाकडून शिविगाळ

अमळनेर- अर्नाळा- चोपडा बसमध्ये कर्तव्यावर असणाऱ्या वाहकाने ज्येष्ठ नागरिक दांपत्याला शिविगाळ केली. ही घटना मंगळवार, दि. १८ नोव्हेंबर रोजी घडली. याप्रकरणी मुरलीधर पाटील यांनी वाहकावर कारवाईची मागणी केली आहे. याबाबत त्यांनी परिवहन मंत्र्यांकडे ऑनलाईन तक्रार केली आहे. मुरलीधर पाटील यांनी तक्रारीत म्हटले आहे, की आम्ही १८ नोव्हेंबर रोजी नाशिक येथून अमळनेर येण्यासाठी अर्नाळा- चोपडा बसमध्ये बसलो होतो. सायंकाळी साडेचार वाजेच्या सुमारास बस कचेरी जवळील थांब्यावर थाबली. मात्र, बसमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी होती. माझ्या पत्नीला दीर्घ आजार असल्यामुळे उतरण्यास उशीर झाला. यावेळी बसमध्ये कार्यरत असलेले वाहक श्री. राजपूत यांना त्याचा राग आला. त्यांनी आम्हास अर्वाच्च शिविगाळ केली. धक्काबुक्की करून खाली उतरविले.

# ‘ शविआ ’चे प्रभाग ४ (ब) उमेदवार इम्रान खाटीक यांचा जोरदार प्रचार

## अल्पसंख्याक आघाडीचे शहराध्यक्ष कलिमोद्दीन शेख यांचा जाहीर पाठिंबा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिका निवडणूक रिंगणात असलेल्या शहर विकास आघाडीचे प्रभाग ४ (ब) चे अधिकृत उमेदवार इब्राहीम हबीब खाटीक ऊर्फ इम्रान खाटीक यांचा जोरदार प्रचार सुरू झाला आहे. माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत राष्ट्रवादी काँग्रेसचे अल्पसंख्याक आघाडीचे शहराध्यक्ष कलिमोद्दीन जलालोद्दीन शेख व राष्ट्रवादी काँग्रेसचे निष्ठावान कार्यकर्ते प्रशांत बडगुजर यांनी इम्रान खाटीक यांना पाठिंबा दर्शविला आहे.



*अमळनेर : ‘ शविआ ’चे प्रभाग ४ (ब) चे उमेदवार इम्रान खाटीक यांना पाठिंबा दिल्याबद्दल कलिमोद्दीन शेख यांचा सत्कार करताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या प्रतिभाताई शिंदे व माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील. शेजारी उमेदवार इम्रान खाटीक, हेमंत पवार व शहर विकास आघाडीचे कार्यकर्ते.*

कलिमोद्दीन शेख आमदार अनिलदादा पाटील यांचे अत्यंत निकटवर्तीय कार्यकर्ते आहेत. प्रभाग ४ (ब) मधून ते देखील इच्छुक उमेदवार होते. मात्र, इम्रान खाटीक यांचे ते जवळचे मित्र आहेत. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सोबत काम केले आहे. त्यामुळे समाजाला न्याय देण्याच्या व प्रभागाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून त्यांनी इम्रान खाटीक यांना आपले समर्थन दिले आहे. आमदार पाटील यांच्या माध्यमातून मुस्लीम समाजबांधवांच्या विविध विकासकामांसाठी सुमारे १४ कोटींची कामे मिळाली आहेत. आमदार अनिलदादा पाटील यांनी कुठलाही आकसभाव न ठेवता सर्व जाती-धर्मीयांना विकासाच्या प्रवाहात आणले आहे. ज्या ठिकाणी अल्पसंख्याक बांधव मोठ्या प्रमाणात आहेत त्या सर्व भागांत मोठी विकासकामे सुरू आहेत. आगामी काळातही आमदार पाटील यांच्या माध्यमातून प्रभागाचा व शहराचा सर्वांगीण विकास साधावयाचा आहे. त्यामुळे शहर विकास आघाडीच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन कलिमोद्दीन शेख यांनी केले आहे.

दरम्यान, इम्रान खाटीक यांच्या प्रचाराने आता वेग घेतला आहे. मतदारांच्या भेटीगाठी घेऊन प्रभागाच्या सर्वांगीण विकासाबाबत ते मतदारांना ग्वाही देत आहेत. प्रभागाच्या विकासासाठी आमदार अनिलदादा पाटील हेच न्याय देतात. त्यांच्या मार्गदर्शनात आगामी काळात प्रभागसह शहराचा सर्वांगीण विकास साधला जाणार आहे. प्रभागातील सर्व जाती-धर्मांतील समाजबांधवांच्या अडी-अडचणी तसेच विकासकामांसाठी आपण कटिबद्ध आहोत, अशी ग्वाही उमेदवार इम्रान खाटीक यांनी दिली आहे.

### प्रशांत बडगुजरांचाही पाठिंबा



प्रशांत बडगुजर हे देखील आमदार अनिलदादा पाटील यांचे खंदे समर्थक आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे ते निष्ठावान कार्यकर्ते आहेत. प्रभाग ४ (ब) मधून उमेदवारीच्या शर्यतीत होते. मात्र, इम्रान खाटीक हे त्यांचे जुने जीवलग मित्र आहेत. ‘ शविआ ’कडून इम्रान खाटीक यांना उमेदवारी मिळाल्याने त्यांना न्याय मिळाल्याची भावना श्री. बडगुजर यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे त्यांनीही मित्रत्वातून इम्रान खाटीक यांना जोरदार समर्थन दिले आहे. त्यांच्या पाठिंब्याने इम्रान खाटीक यांच्या समर्थकांमध्ये व कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य संचारले आहे.



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
‘ चमकण्याची ’ तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले
महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!
डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.



## ग्राहक पंचायतीतर्फे डॉ. अपर्णा देशमुखांचा सत्कार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- समाजातील निराधार व वंचित वृद्धांच्या सेवेसाठी समर्पित कार्य करणाऱ्या ‘आभाळमाया’ संस्थेच्या प्रमुख डॉ. अपर्णा देशमुख यांचा अखिल भारतीय ग्राहक पंचायतीतर्फे सत्कार करण्यात आला आहे. ग्राहक पंचायतीचे जिल्हा उपसचिव मकसूद बोहरी यांच्या निवासस्थानी गुरुवार, दि. २० नोव्हेंबर रोजी हा कार्यक्रम पार पडला.

डॉ. देशमुख यांना रोटरी इंटरनॅशनलतर्फे नवी दिल्ली येथे रविवार, दि. १६ नोव्हेंबर रोजी प्रतिष्ठित “ तेजस चेंज मेकर पुरस्कार ” सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व सन्माननिधीसह प्रदान करण्यात आला होता. समाजसेवेत त्यांच्या सातत्यपूर्ण योगदानाची आंतरराष्ट्रीय स्तरावरही दखल घेण्यात आली आहे. अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे मध्य महाराष्ट्र प्रांत सचिव तथा माजी जिल्हाध्यक्ष डॉ. अनिल देशमुख व सौ. निर्मला देशमुख यांच्या त्या कन्या आहेत. त्यांना मदर टेरेसा अॅवॉर्डसह अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. माजी राष्ट्रपती सौ. प्रतिभाताई पाटील आणि (स्व.) सिंधुताई सपकाळ यांनीही त्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे. डॉ. देशमुख यांनी गेली १५ वर्षे कोणतीही सरकारी मदत न घेता पुणे येथील ‘आभाळमाया’ वृद्धाश्रमाच्या माध्यमातून सुमारे ५ हजारहून अधिक वृद्धांना निवारा दिला आहे. ३ हजार पेक्षा जास्त वृद्ध रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यास संस्थेने मदत केली आहे. मकसूद बोहरी यांनी त्यांचे स्वागत केले. डॉ. देशमुख यांचे पूत्र डॉ. अमित देशमुख व डॉ. नीता यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी श्री मंगळ ग्रह सेवा संस्थेचे खजिनदार गिरीश कुलकर्णी, सहसचिव दिलीप बहिरम, ग्राहक पंचायतीच्या सौ. कपिला मुठे, सुनील वाघ, ताहा बुकवाला, भाऊसाहेब देशमुख आदी उपस्थित होते. जिल्हा उपाध्यक्ष सतीश देशमुख यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सौ. वनश्री अमृतकर यांनी आभार मानले. मेहराज बोहरी यांनी सहकार्य केले.




## मना सज्जना...

# गमूं पंथ आनंत या राघवाचा...



' मनाचे श्लोक ' यांच्या अर्थवाही प्रवासाला ग्लोबल महातेजने प्रसिध्द करण्यास प्रारंभ केला आहे. त्यात २०५ श्लोकांतील पहिला श्लोक आपण घेऊया.

**श्लोक १**

**गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा ।**
**मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा ॥**
**नमूं शारदा मूळ चत्वार वाचा ।**
**गमूं पंथ आनंत या राघवाचा ॥ १ ॥**

शब्दनिहाय अर्थ आहे- **गणाधीश :** गणपती, जो सर्व देवांचा अधिपती **ईश :** ईश्वर आहे. **तो सर्वां गुणांचा :** अधिपतीही आहे. **हा मुळारंभ :** म्हणजे मूळ आरंभ आहे. ज्याच्यामुळे निर्गुणाकडून सगुण ईश्वराकडे जाता येते. पंचमहाभूत यांना सगुण साकार रूपात पाहावयाचे असेल, तर त्यांना शारीर अवस्थेत पाहावे लागते. मूर्ती स्वरूपात पाहावे लागते. यात प्रथम देवता म्हणून श्रीगणेशाचा मान आहे.

आपल्या संस्कृतीत कोणत्याही शुभ कार्याला प्रथम श्रीगणेशाला वंदन करून कार्य सुरूवात करण्याची प्रथा आहे. कोणताही शुभ संकल्प हा देवतांच्या आशीर्वादाने पूर्णत्वास येतो. समर्थ म्हणून प्रथम श्रीगणेशाला वंदन करताहेत. त्यांची कृपा असावी म्हणून प्रार्थना करताहेत. यासोबतच विद्येची देवता असलेल्या सरस्वतीला **नमूं शारदा :** म्हणून वंदन करताहेत. ही शारदा श्रीदेवी, वागेश्वरी देवी म्हणजे आपल्या मुखातून प्रगट होणारी वाचा. **मूळ चत्वार वाचा :** चारी वाणींचे मूळ असलेली.

दासबोधात समर्थांनी चार वाणींचे वर्णन केले आहे. **नाभीपासून उन्मेष वृत्ती । ते ची ' परा ' जाणते श्रोती । ध्वनीरूप ' पश्यंती ' हृदयी वसे । कंठापासून नाद झाला । ' मध्यमा ' वाचा बोलीजे त्याला । उच्चार होता अक्षराला । ' वैखरी ' बोलीजे ॥**

परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी या त्या चत्वार वाचा. आपण स्थूलमानाने वाणी म्हणतो तिला देखील वंदन केले आहे. **- गमूं पंथ आनंत या राघवाचा :** श्रीरामाचा पंथ जो अनंतकाळापासून प्रचलित आहे त्या पंथाचे अनुसरण करायला सुचवितात.

समर्थ सुरूवातीस गणपती, सरस्वती व प्रभू श्रीरामचंद्र यांचे स्मरण करून वंदन करून कृपाशीर्वाद मागतात. पुढे श्लोक साधकास नम्रतेने भक्तिभावाने आंतरिक शुद्धते रामनामाच्या पंथाचा अंगीकार करायला सांगतात. संसारी व्यक्तीला धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ प्राप्त करायचे असतात. हे करत असताना परमार्थही साधायचा आहे. तेव्हा ' मनाचे श्लोक ' याबाबत सखोल मार्गदर्शन करतात.

**' महाजनो येन गतः स पन्थाः'**

असे एक संस्कृत सुभाषित आहे. त्याचा अर्थ असा, की ' महान, थोर, संत किंवा श्रेष्ठ व्यक्ती ज्या मार्गावर चालले आहेत, तोच मार्ग सत्याचा आहे.' धर्म पालन करताना किंवा जीवन जगताना अनेक मत-मतांतरे, तर्क-वितर्क, योग्य-अयोग्य असा पेच निर्माण होतो. प्रत्येकाला त्यातून मार्ग काढणे कठीण असते. अशावेळी थोर पुरुष किंवा संत स्वतः साधना करून अनुभूतीने जगण्यासाठी जो मार्ग निवडतात त्याच मार्गाचे अनुकरण करणे हेच आपल्यासाठी उत्तम असते. त्याच मार्गाचे सर्वसामान्यांनी अनुसरण करावे म्हणजे त्यांचा सहज उद्धार होतो. संतांनी त्यांच्या अभंगांतून सतत हा भक्तीमार्ग पंथ आपल्यासाठी कसा लाभदायक आहे ते सांगितले आहे. मार्गदर्शन केले आहे.

संत निळोबाराय यांचा एक अभंगच आहे...

**मार्ग दावूनिया गेले आधी ।**
**दयानिधी संत ते ।**
**तयाचेने पंथे चालो जाता । न पडे गुंता कोठे काही ।**

अगदी याच भावनेतून समर्थ आपल्याला प्रभू श्रीरामचंद्रांच्या पंथाचे अनुसरण करायला सांगतात...

**' ... गमू पंथ आनंत या राघवाचा...'**

चला आपणही या राघवाच्या पंथाचे पांथस्थ होऊया...

**जय जय रघुवीर समर्थ!**

**- भाऊसाहेब देशमुख,**
**अमळनेर.**
**मो. : 94203 89541**



# वारकरी संप्रदाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्रातील एक अत्यंत लोकप्रिय भक्तिसंप्रदाय. ' वारी करणारा ' या अर्थाने ' वारकरी ' हा शब्द वापरण्यात आलेला आहे. ' वारी ' या शब्दाचा अर्थ यात्रा, नियमित फेरी, व्रत, येरझार असा दिला जातो, हे लक्षात घेतल्यास आपल्या उपास्य देवतेच्या-मग ती कोणतीही असो-यात्रेला जो नियमितपणे, एक व्रत म्हणून जातो, तो ' वारकरी ' असे म्हणता येईल.

येरझारांमध्ये जी वारंवारता आहे तीही येथे अभिप्रेत आहे. तथापि वारकरी संप्रदाय म्हणजे पंढरपूरच्या विठोबाशी संबंधित असलेला वारकरी संप्रदाय, असाच अर्थ घेतला जातो. याचे मुख्य कारण म्हणजे विठोबा वा विठ्ठल वा पांडुरंग या आपल्या उपास्य दैवताच्या वारीला या संप्रदायाने जितके महत्त्व दिले आहे तितके अन्य कोणत्याही पंथाने त्याच्या उपास्य दैवताच्या वारीला दिलेले नाही. वारकरी संप्रदायाच्या आचारधर्मानुसार संप्रदायाच्या अनुयायांनी प्रतिवर्षी दोन वेळा- म्हणजे आषाढ शुद्ध एकादशीस व कार्तिक शुद्ध एकादशीस- श्रीविठ्ठलाची वारी पंढरपूर क्षेत्री जाऊन केली पाहिजे. शुद्ध माघी एकादशी व शुद्ध चैत्री एकादशी या दोन दिवशीही पंढरपूर येथे मोठ्या संख्येने वारकरी जमतात. तथापि आषाढी एकादशी आणि कार्तिकी एकादशी ह्या दोन वाऱ्या प्रमुख मानल्या जातात. त्यांतही आषाढीला महत्त्व विशेष आहे.

ज्यांना वर्षातून एकदाच- म्हणजे आषाढीला किंवा कार्तिकीला- येणे शक्य असते, त्यांनी तसे केले तरी चालते; परंतु प्रतिवर्षी किमान एकदा तरी वारी करणे, ही वारकऱ्यांची मुख्य साधना होय. श्रीज्ञानदेवांनी समाधी घेतल्यानंतर प्रतिवर्षी कार्तिक वद्य एकादशीस वारकरी संप्रदायाचे अनुयायी आळंदीलाही नियमाने जमू लागले.

वारकरी संप्रदायाला ' माळकरी संप्रदाय ' असेही एक पर्यायी नाव आहे. प्रत्येक वारकऱ्याच्या गळ्यात तुळशीच्या १०८ मण्यांची माळ असते. इतर अनेक धर्मपंथांत माळेला स्मरणी म्हणून महत्त्व आहेच; पण वारकरी संप्रदायात ही तुळशीच्या मण्यांची माळ घातल्याखेरीज कोणाला वारकरी होताच येत नाही. माळ घालणे, म्हणजे एक नवा आध्यात्मिक जन्म घेणे, असे मानले जाते. वारकरी संप्रदायात माळ म्हणजे निव्वल स्मरणी नव्हे.

हा संप्रदाय भागवत धर्मातच अंतर्भूत होतो. किंबहुना त्यास ' भागवत धर्म ' असेही म्हटले जाते. भागवत धर्म हा प्रामुख्याने वैष्णव संप्रदाय म्हणूनच विख्यात आहे. त्यात भगवान विष्णू आणि विशेषतः त्याचा कृष्णावतार वासुदेव भगवान हाच उपास्य आहे. वारकरी संप्रदायाचे उपास्य दैवत विठ्ठल, हे विष्णूचा अवतार मानल्या गेलेल्या भगवान श्रीकृष्ण यांचे रूप मानले गेले आहे. याच कारणासाठी पंढरपुरास ' दक्षिण द्वारका ' असे संबोधण्यात येते.

वारकरी संप्रदायाचे उपास्य दैवत असलेल्या विठ्ठलाचे निर्देश श्रुतिस्मृतिपुराणांत आलेले नाहीत. विष्णुसहस्रनामांत तसेच भगवान विष्णूंच्या मानल्या गेलेल्या चोवीस अवतारांत विठ्ठलाचा अंतर्भाव झालेला दिसत नाही. तथापि विठ्ठलाला इसवी सनाच्या अकराव्या-बाराव्या शतकांपासून असाधारण अशी वैष्णव प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे.

विष्णूपासून विठ्ठल हे नाव बनले, असे मत काही अभ्यासकांनी व्यक्त केलेले आहे. उदा.- विष्णू-विष्टु-विठ्ठल असे विठ्ठल हे नाम तयार झाले, असे अनेक अभ्यासक मानतात. तथापि विठ्ठल हे विष्णूचे अपभ्रष्ट रूप नसून विठ्ठलभक्तीच्या क्षेत्रापुरते विष्णू हे ' विठ्ठल 'चे (विठूचे) उद्‌भ्रष्ट रूप होय, असे डॉ. रा. चिं. ढेरे यांचे मत आहे. त्यांच्या मते विठ्ठल हा देव एकेकाळचा लोकदेव असला पाहिजे आणि तो क्रमाने कीर्तिवंत होत गेल्यानंतर त्याचे वैदिकीकरण करण्यात आले. पंढरपूरच्या विठ्ठलाचे मूळ हे गोपजनीय परंपरेत आहे, असा विचार दुर्गा भागवत यांनी याहीपूर्वी मांडलेला आहे.

वारकरी संप्रदायाचे एक प्रमुख प्रचारक शं. वा. ऊर्फ सोनोपंत दांडेकर यांनी वारकरी संप्रदाय हा वैदिक धर्मांतर्गत एक पंथ असून वैदिक धर्माच्या तत्त्वांशी अतिशय जुळते घेणारा, असा पंथ असल्याचे म्हटले आहे. वारकरी पंथ म्हणजे सनातन वैदिक धर्माची भक्तीस प्राधान्य देणारी शाखा, असेही त्यांनी म्हटले आहे.

पंढरपूरचा विठोबा हे वारकरी संप्रदायाचे उपास्य दैवत असल्यामुळे वारकऱ्यांचे मुख्य क्षेत्र पंढरपूर आणि तीर्थ चंद्रभागा होय. विठोबा हे श्रीकृष्णाचेच रूप आहे, अशी सर्व संतांची धारणा असल्यामुळे वारकरी संप्रदाय हा कृष्णोपासकही आहेच. तथापि तो रामाचाही उपासक आहे. द्वारका, काशी ही क्षेत्रेही वारकरी पवित्र मानतात. तसेच चंद्रभागेप्रमाणेच इंद्रायणी, गोदावरी, कऱ्हा, तापी या नद्यांनाही त्यांनी पवित्र मानले आहे. शिवाय सर्व हिंदूंनी पवित्र मानलेल्या गंगा, कृष्णा आदी नद्यांनाही ते पवित्र मानतातच.

गीता, भागवतपुराण, ज्ञानेश्वरी, ज्ञानेश्वरकृत हरिपाठ, संस्कृतातील भागवतपुराणाच्या एकादश स्कंधावरील संत एकनाथकृत एकनाथी भागवत, भागवतपुराणाच्या द्वितीय स्कंधाच्या नवव्या अध्यायातील ३२ ते ३५ अशा चार श्लोकांवर एकनाथांनीच लिहिलेले चतुःश्लोकी भागवत, एकनाथांचा हरिपाठ आणि तुकारामांची अभंगगाथा, हे ग्रंथ वारकरी संप्रदायाला प्रमाणभूत होत. त्यातही ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत आणि तुकोबांची अभंगगाथा, ही वारकरी संप्रदायाची प्रस्थानत्रयी मानली जाते. या संप्रदायातील इतर संतांच्या रचनाही वारकरी अर्थातच आदराने वाचतात.

वारकरी संप्रदायाची दीक्षा घेण्याचा विधी अगदी साधा असतो. या संप्रदायात फड (प्रत्येक महंताच्या वा वारकरी साधूच्या भोवती असलेला त्याच्या शिष्यमंडळींचा समुदाय)असतात. दीक्षा घेऊ इच्छिणाऱ्याला अशा एखाद्या फडप्रमुखाकडून तुळशीच्या १०८ मण्यांची माळ घालून घ्यावी लागते. दीक्षेची पद्धत अशी : ही माळ आणून दीक्षा देणाऱ्या साधूकडे वा फडप्रमुखाकडे जावयाचे. तो ती माळ ज्ञानेश्वरीवर ठेवतो आणि प्रतिवर्षी पंढरीची वारी करण्याचे वचन दीक्षा घेऊ इच्छिणाऱ्याकडून घेतो. वर म्हटल्याप्रमाणे पंढरपूरची किमान एक तरी वारी केलीच पाहिजे. तसेच आळंदीची वारीही केलीच पाहिजे.

संप्रदायाच्या इतर नियमांची आणि आचारधर्माची कल्पनाही दीक्षा घेणाऱ्याला फडप्रमुख देतो. हे नियम असे आहेत : १) सत्य बोलावे. २) परस्त्रीला मातेसमान मानावे. ३) कांदालसूण आणि मांसाहार वर्ज्य करावा. ४) मद्यपान वर्ज्य करावे. ५) रोज हरिपाठ करावा, तसेच ' रामकृष्णहरी ' या मंत्राचा जप करावा. ६) प्रपंचातील कर्मे श्रीविठ्ठलस्मरण करीत पार पाडावी. हे सर्व नियम पाळण्याचे कबूल करून ज्ञानेश्वरीवर ठेवलेली तुळशीच्या मण्यांची माळ तो भक्त उचलतो आणि ' पुंडलीक वरदा हरिविठ्ठल ' या गजरात गळ्यात घालतो.

दीक्षाविधीवेळी गळ्यात घातलेली ही तुळशीची माळ काही कारणाने तुटल्यास ती पुन्हा गुंफून गळ्यात घालीपर्यंत वारकऱ्याला अन्नसेवन करता येत नाही.

वारकऱ्याच्या आचारधर्माचा आणखी एक भाग म्हणजे त्याने गोपी चंदनाचा ऊर्ध्व पुंड्र लावून मुद्रा लावल्या पाहिजेत, त्याचप्रमाणे द्वादश टिळेही लावले पाहिजेत.

प्रत्येक वारकरी पंढरपूरची वारी वर्षातून किमान एकदा तरी करतोच, तथापि ज्ञानदेवांनी समाधी घेतल्यानंतर कार्तिक वद्य एकादशीसही वारकरी आळंदीला जाऊ लागले हा उल्लेख वर आलाच आहे. संत नामदेवांच्या (१२७० - १३५०) काळातच ही आळंदीवारी सुरू झाली. सासवड, त्र्यंबकेश्वर, एदलाबाद, पैठण, देहू, पिंपळनेर, आळबेल्हे इत्यादी ठिकाणीही वारकऱ्यांची यात्रा भरते. त्या-त्या स्थळी झालेल्या विशिष्ट संतांच्या वास्तव्यामुळे ही ठिकाणे पवित्र मानली गेली आहेत. तथापि विठ्ठलाच्या सर्व वाऱ्या शुद्ध पक्षातल्या असून भक्तांशी संबंधित असलेल्या स्थानी होणाऱ्या वाऱ्या वद्य पक्षातील आहेत.

# चांडाळ योग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गुरु ज्ञान व बुद्धि प्रदान करत असतो आणि राहु छाया ग्रह आहे जो सदैव अनिष्ट फळ देतो अशी मान्यता आहे कि गुरु देवांचे गुरु आहे आणि राहु राक्षसांचे गुरु आहे. या दोन्ही ग्रहांचा कुठल्याही प्रकारे संबंध जुळला तर गुरु चांडाळ योग निर्माण होतो.

कुंडलीत गुरु आणि राहुची युति झाल्या वर हा योग बनतो राहुच्या प्रभावात आल्या नंतर गुरु अनिष्ठ फळ देण्याची सुरुवात करतो. चांडाळ योग चांगला मानला जात नाही, तर तुच्छ मानला जातो. अशी लोकांची मान्यता आहे की, या योगाची सावली देखील या संसाराला व गुरूला अशुद्ध करू शकते.

**प्रभावित व्यक्ती**

जसे आम्ही तुम्हाला पहिल्यांदाच सांगितले आहे कि, चांडाळ योग असलेला व्यक्ती आपल्याच गुरुच्या प्रती ईर्ष्या भाव ठेवतो... या चांडाळ योगाच्या प्रभावा मुळे व्यक्तीचे मन दुसऱ्या स्त्री वर येते आणि त्याचे चारित्र्य खराब होण्याची सुरुवात होते. याच्या अतिरिक्त अशी व्यक्ती चोरी, जुगार, सट्टा,



अनैतिक कार्य, नशा आणि हिंसक कार्यात लिप्त राहते

**प्रभाव**

कुंडलीत चांडाळ योग बनल्या नंतर व्यक्ती आपल्या गुरूचा अनादर करतो आणि गुरुच्या प्रती ईर्ष्या ठेवतो. जर कुंडलीत राहु मजबूत स्थितित असेल तर व्यक्ती आपल्या गुरूचे जे काम असेल तेच काम तो करतो, परंतु आपल्या गुरुचे जे सिद्धांत आहेत त्याची अवहेलना करतो. शिष्य आपल्या गुरूच्या कामाला चांगल्या प्रकारे करून त्या कामाला आपलसं करून प्रस्तुत करतात तथा शिष्या समोर आपल्या गुरुचा अपमान होत आहे हे पाहून देखील शिष्य चुपचाप हे सगळ पाहात असतात.

याच्या विपरीत दुसरीकडे राहु कमजोर असल्याच्या स्थितित व्यक्ती आपल्या गुरुचा आदर, सन्मान करतात राहु समोर गुरूचा प्रभाव खूप कमजोर पडतो. गुरू, राहुच्या दुष्प्रभावाला कमी करण्यात असफळ होतो.

**उपाय**

राहु ग्रहाचा जप-दान केल्यानी लाभ होईल. गायीला चारा घालावा, तसेच नियमित हनुमान चालीसाचा पाठ करावा.

कुठलाही महत्वपूर्ण निर्णय घेण्या अगोदर घरातील मोठ्या माणसांचा सल्ला घ्यावा. आपल्या वाणीवर नियंत्रण ठेवावे आणि प्रसन्न राहावे. वयस्कर माणसांचा आदर- सन्मान करावा व आपल्या आई-वडिलांचा आदर करावा.

आपल्या गुरुची निस्वार्थ भावाने सेवा करावी. दररोज हळद आणि केसराचा टिळक कपाळावर लावला तर लाभ होईल. गरीब मुलांच्या शिक्षणात त्यांची मदत करावी. गणपती बप्पा आणि देवी सरस्वती यांची पूजा-अर्चना करावी व मंत्र जाप करावा. वडाच्या झाडाला कच्चे दूध घालावे आणि केळीच्या वृक्षाची पूजा करावी अशी मान्यता आहे.

